# कप बशी

रात्र झाली. घरात झोपाझोप झाली. काही माणसं घोरु लागली. काही माणसं लोळू लागली. ह्या कुशीवरुन त्या कुशीवर वळू लागली.

स्वयंपाकघरात कप, बशी आणि चमचा ःआपापसात गप्पा मारु लागले.

**चमचा :** कपराव तुमचं बरं आहे हो. माणसांचे फक्त ओठच तुम्हाला लागतात!

**कप :** अहो काही तरी काय? अहो,काही माणसांच्या मिशा सुध्दा चहात बुडतात!! मग हे मिशाळजी,त्यांच्या मिशा माझ्या अंगावर... छीSSछी!

**चमचा :** पण..पण माझं दु:ख काही वेगळंच आहे.

**कप :** आँ! कुठलं बरं?

**चमचा :** माणसं मला तोंडात घालतात. चोखतात. चाटतात. कधी कधी चावतात तेव्हा अगदी कससंच वाटतं मला.

**कप :** अरे हे एकवेळ ठीक आहे.
पण माझ्यात गरम चहा, कॉफी ओततात तेव्हा मी भाजून निघतो; त्याचं काय?

**चमचा :** अहो कपभाऊ काय सांगू?
त्याच गरम चहात मला चक्कर येईपर्यंत गरगर गरगर फिरवतात. मग दाणकन बशीत आपटतात.

**बशी :** हो ना! त्यावेळी मला तुमचा फार म्हणजे फार राग येतो. पण मी त्यावेळी तुम्हाला काही बोलूच शकत नाही.

**चमचा :** (तोंड वाकडं करुन) ओह! कॅ बरॅ बोलू शकत नाही?

**बशी :** कसं बोलणार? मी काही बोलण्या आधीच, ह्या घरातली माणसं माझ्या तोंडावर चहा ओततात आणि पुन्हा वर तोंड करुन फूक मारतात. थुकी उडवतात.

**कप :** त्यावेळी माझ्या जरा जीवात जीव येतो!

**चमचा :** का बरं?

**कप :** अहो, मी जरा अर्धा रिकामा झालो की श्वास घ्यायला जागा मिळते.

**बशी :** ..आणि... माझा श्वास गुदमरतो म्हंटलं! त्याचं काय?

**चमचा :** अहो बशीताई, म्हणून तर माणसं फूक मारतात!

**बशी :** इश्श! खरंच की.

**चमचा :** तुम्हा दोघांचं बरं आहे. तुम्ही दोघं एकमेकांना सांभाळून असता.नेहमी जोडी जोडीने असता.

**कप :** अहो, ही दोन कानवाली माणसं हात मोडकी असतात...हात मोडकी..

**बशी :** आणि बेफिकीर...वेंधळी सुध्दा!!

**कप :** हो ना! त्यांनी माझा कान पकडला की मला टेन्शन यायला सुरुवात होते. माझं ‘टी प्रेशर’ वाढतं! माझं अंग गरम होतं.

**बशी :** अहोS.. काही आगाऊ माणसं, फक्त कपातूनच चहा पितात. मग माझी होते पंचाईत!

**चमचा :** अं.....अं... माझा जरा गोंधळ होतोय. अं.. म्हणजे कपरावांचं टी प्रेशर का वाढतं?
आणि..बशीताई तुमची पंचाईत का होते?

**बशी :** अहो असं काय करता चमचेभाऊ?
माणसांनी फक्त श्री.कपरावांना उचललं की आमची ताटातूटच होते.
मग ही माणसे मला कुठेही ठेवतात.
टेबलाच्या कडेवर, खूर्चीच्या खाली, कॉटवर, टिव्हीच्या बाजूला नाहीतर स्वतःच्याच पायाजवळ. त्यावेळी..(आवाज रडवेला होतो).. त्यावेळी...

**कप :** अगं, त्यावेळी माझं लक्षं असतं बरं तुझ्याकडेच!

**बशी :** मी..मी तर त्यावेळी,‘जीव बशीत धरुन’ तुमची वाट पाहात असते.

**चमचा :** (वैतागून) पण..पण इतकं भ्यायचं कारणच काय?

**बशी :** तुम्हा काय समजणार म्हणा?

**कप :** अहो, तुम्हाला सांगणं म्हणजे,‘पालथ्या चमच्यावर दूध ओतण्यासारखं आहे.’

**चमचा :** पण तुम्ही मला अगदीच ‘बीन साखरेचा चहा ’ समजू नका.

**बशी :** नाही,नाही.तसं नव्हे हो!
अहो टेबलाच्या कडेवर,टिव्हीवर आणि कॉटवर बसलेल्या माझ्या चार पाच बहिणी, माझ्या तोंडादेखत गेल्यात!
अगदी तुकडे तुकडे होऊन गेल्यात हो!
एकदा...एकदा...एक जाड्या लठ्ठ गट्टू मुलगा कॉटवर असा बसला की, माझ्या एका बहिणीचा कणाच मोडला!!

**कप :** होय होय! म्हणून तर,‘माझा कान माणसाच्या हातात,तेव्हा माझा जीव बशीच्या प्रेमात अडकलेला असतो’!!

**बशी :** (लाजून) इश्श!
अहो चमचेभाऊ, तुम्ही तसे अमर आहात. त्यामुळे आमचे प्रॉब्लेम तुम्हाला समजणं... जरा कठीणच...

**कप :** म्हणजे, त्याचं असं आहे; या दुष्ट माणसांनी माझ्या दोन भावांना अपंग केलं. माझ्या भावांचे कानच तोडले!
आणि...आणि...(एकगम रागाने)..अपंग झाले तर त्यांची काळजी घ्यायची सोडून, त्यांना कुठेतरी गायबच करून टाकलं!!

**बशी :** त्या लहान मुलाला जरासं खरचटलं,तर लगेच डॉक्टर काय? औषधं काय? खेळणी काय? नुसते लाडच लाड!!
स्वतःसाठी एक न्याय आणि आमच्यासाठी मात्र दुसरा! स्वार्थी कुठले?!

**चमचा :** कमालच आहे या माणसांची! कपरावांचा जरा कान तुटला तर अख्खा कप गायब!!

**कप :** पाहा ना! अहो त्यामुळे आमचं अख्खं कुटूंब उध्वस्त होतं ना.
पण... तो मोठा मुलगा आहे ना,त्याला आमच्या कुटूंबा विषयी प्रेम आहे.

**बशी :** परवा,श्री कपरावांचा कान दुखावला. मधलाच टवका उडाला! माझ्या बाई,‘तोंडचा चहा पळाला’!
म्हणतात न,‘साखर चिंती ते माणुस न चिंती’! माझ्या मनात विचार आला,झालं! आता

श्री. कपराव चालले 'गायब भावजींना' भेटायला!
पण...(आनंदाने)...'दूध साखर पावली मला'!

**कप :** त्या मुलाने, मला न दुखवता, न तापवता, न आपट धोपट करता, अगदी हळूवारपणे, माझी 'चिनी माती सर्जरी' केली. आणि कान झाला ठाकठीक!

**बशी :** तशा या घरातल्या बायका पण चांगल्या आहेत. आम्हाला घासून पुसून स्वच्छं ठेवतात. 'ह्यांचे' कान सुध्दा साफ करतात.

**चमचा :** या घरातला तो टकलू माणूस, जरा आगाऊ आहे का हो?

**बशी :** जरा? ज्यादाच आगाऊ आहे तो!
माझ्याकडे पाहून नेहमी तोंड वेंगाडतो. आमच्याकडे पाहून म्हणतो कसा,"कप द्या झटपट, हिची नको कटकट."

**कप :** कालचीच गोष्ट. मी फार करवडलो होतो. अंगावर जिकडे तिकडे सुकलेल्या चहाचे डाग. वरच्या बाजूला साय चिकटलेली. खरं तर अशा अवस्थेत,'कुणाला कान दाखवायला' मला लाजच वाटते. तर, तो श्री. आगाऊ माझा कान धरुन म्हणतो कसा,"अहो वहिनी, ह्याच कळकट कपात चहा द्या. म्हणजे जरा टेस्ट वाढेल. जेव्हढा कप कळकट,तेव्हढी चव बळकट! हा हा हाSSS!"

**बशी :** जाऊ दे! बोलणाऱ्याचं का तोंड धरता येतं?

**कप :** ...पण तोंडात गरम चहा तर ओतता येतो!
जिभेला चहाचे चटके तर देता येतात? काSSय?!

**चमचा :** बापरे! मग तुम्ही काय केलंत?

**बशी :** काहीच केलं नाही!

**चमचा :** (वैतागून) का? का काही केलं नाही?

**कप :** अरे, जर का मी त्याच्या तोंडात गरम चहा ओतला असता, तर त्याने घाबरुन माझा धरलेला कान सोडला असता....आणि मग....

**बशी :** (दचकून) नको...नको... रात्रीच्या वेळी अभद्र बोलू नये!
(ठामपणे) मी एक सांगते, ती माणसं आपल्याला काय वाट्टेल ते बोलली, आपल्याशी कशी ही वागली तरी... तरी...आपण त्यांच्याशी चांगलंच वागायचं बरं! आपण नाही वेडेपणा करायचा!!

**कप :** (वैतागून) होय! कारण 'माझा कान त्यांच्या मुठीत आहे' म्हणून ना?

**बशी :** नव्हे...नव्हे! आपण त्यांच्या घरात राहतो. आपण त्यांच्या 'खाल्ल्या साखरेला जागलं पाहिजे!!' त्यांच्या प्रेमाची पण आठवण ठेवली पाहिजे.

**चमचा :** मला मात्र त्यांच्या खाल्ल्या साखरेला आणि मिठाला पण जागलं पाहिजे.

**बशी :** अगं बाई! बेल वाजली वाटतं? दूधवाला आला असणार.
गप्पा मारताना, रात्र कशी साखरे सारखी विरघळली, कळलं सुध्दा नाही!

---

राजीव तांबे.
rajcopper@gmail.com